# महाराष्ट्र शासन
## कृषी विभाग

कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, तळमजला,
साखर संकुल इमारत, शिवाजीनगर, पुणे-४११००५

दूरध्वनी क्र ०२०-२५५१२८१३ Email :- esttcl2@gmail.com


जा.क्र.कृआ/एवायझेड/परीक्षा२१/विकल्प/आस्था-१/६३/२३ दिनांक :१३ डिसेंबर, २०२३

प्रति,
सर्व संबधित उमेदवार

**विषय :- महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब संवर्गात सरळसेवेने नियुक्ती देणेबाबत.**

संदर्भ :- शासन पत्र क्र. कृषीआ-१६२३/प्र.क्र.२१४/१५-अे., दि. ०४ डिसेंबर, २०२३

महोदय,

उपरोक्त संदर्भीय शासन पत्रान्वये, महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा २०२१ करीता महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब संवर्गात कागदपत्र पडताळणीस उपस्थित असलेल्या ६० (१ उमेदवार अनुपस्थित) उमेदवारास सरळसेवेने नियुक्ती देणे प्रस्तावित आहे. शासन अधिसूचना दि. १४ जुलै, २०२१ मधील तरतुदीनुसार निवडसुचीमधील पात्र उमेदवाराना महसुली विभाग वाटपाची कार्यवाही करणेसाठी नमुना-"ब" बंधपत्र मागविण्यात येत आहेत. नमुना-"ब" बंधपत्र सोबत सहपत्रित करण्यात येत आहे.

याबाबत कळविण्यात येते की, शासन अधिसूचना दि. १४ जुलै, २०२१ मधील नियम ७ मधील तरतुदीनुसार खालील परिस्थितीत खालील उमेदवाराना महसूल विभाग वाटपातून सूट अनुज्ञेय आहे.

१) जे अधिकारी स्वत: दिव्यांग आहेत. संगणकीय प्रणालीतील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र साक्षांकीत करून जोडणे आवश्यक राहील.

२) ज्या अधिकाऱ्यांचा जोडीदार किंवा त्याचे मूल मतिमंद आहे किंवा ज्या अधिकाऱ्यांनी मतिमंद असलेल्या स्वत:च्या भावाचे किंवा बहिणीचे पालकत्व स्वीकारलेले आहे. आवश्यक दस्तऐवज सांक्षाकित करून जोडणे आवश्यक राहील.

३) कायदेशीर कागदपत्राव्दारे एकल पालकत्व सिध्द झालेले अधिकारी. आवश्यक दस्तऐवज साक्षांकित करून जोडणे आवश्यक राहील.

महसुली विभागनिहाय संख्यात्मक रिक्त पदांची माहिती तसेच बंधपत्राचा नमुना सहपत्रित करण्यात येत असून कृषी विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. उपरोक्त नमुद सूचनांनुसार आपले नमुना-"ब" बंधपत्र दि२७/१२/२०२३ पर्यंत कृषी आयुक्तालयास

प्रत्यक्ष वा पोस्टाने विहित कार्यालयीन वेळेत पोहोचतील अशा बेताने पाठविण्यात यावी. नमुना-"ब" बंधपत्र बंद पाकीटामध्ये देण्यात यावेत. पाकीटावर **महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब संवर्गासाठी नमुना-"ब" बंधपत्र असे स्पष्ट वाचनीय राहील असे ठळक अक्षरात लिहावे.** जे उमेदवार वैयक्तिक नमुना-"ब" बंधपत्र विहित वेळेत कृषी आयुक्तालयास सादर करणार नाहीत त्यास कृषी आयुक्तालय जबाबदार राहणार नाही. वरील प्रमाणे नियम-७ मधील माहिती चुकीची आढळून आल्यास भारतीय दंड संहिता नियमानूसार कारवाईस पात्र असेल याची नोंद घ्यावी.

सोबत- वरीलप्रमाणे

आपला,

(रविंद्र काळे)
**सहाय्यक प्रशासकीय अधिकारी,**
**कृषी आयुक्तालय म. रा., पुणे**

प्रत- मा. अवर सचिव, १५-अे कृषी व पदुम विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई-३२ यांना माहितीसाठी.

महाराष्ट्र शासन
कृषी विभाग
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
साखर संकुल इमारत, तळमजला, शिवाजीनगर, पुणे-४११००५
दुरध्वनी क्र .०२०/२५५१२८१३ Email ID :- esttcl2@gmail.com

---

# -सूचना -

महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा २०२१ करीता महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब कागदपत्र पडताळणीस उपस्थित असलेल्या ६० (१ उमेदवार अनुपस्थित) उमेदवारास सरळसेवेने नियुक्ती देणे प्रस्तावित आहे. शासन अधिसूचना दि. १४ जुलै, २०२१ मधील तरतुदीनुसार निवडसूचीमधील पात्र उमेदवाराना महसुली विभाग वाटपाची कार्यवाही करणेसाठी नमुना-“ब” बंधपत्र मागविण्यात येत आहेत. नमुना-“ब” बंधपत्र सोबत सहपत्रित करण्यात येत आहे.

वरील प्रमाणे अधिसूचनेतील नियमातील ततरतुदीनूसार नमुना-“ब” बंधपत्र दिनांक २७ /१२/२०२३ पर्यंत कृषी आयुक्तालयास प्रत्यक्ष व पोस्टाने विहित कार्यालयीन वेळेत पोहोचतील अशा बेताने पाठविण्यात यावे. तसेच ज्या उमेदवारांचा वैयक्तिक नमुना“-ब बंधपत्र ”विहित वेळेत कृषी आयुक्तालयास पोहोच होणार नाही त्यास संबंधित उमेदवार स्वत: जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

(रविंद्र काळे)
सहाय्यक प्रशासकीय अधिकारी,
कृषी आयुक्तालय म. रा., पुणे

---

जा.क्र.कृआ/एवायझेड/परीक्षा२१/विकल्प/आस्था-१/६७/२३
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००५.,
दिनांक - १३ डिसेंबर २०२३

प्रति,

---

सर्व संबंधित उमेदवार

प्रत - मा.अवर सचिव १५-अे कृषी व पदुम विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांना माहितीसाठी

## महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब संवर्गातील माहे नोव्हेंबर, २०२३ अखेर महसुली विभागनिहाय मंजुर भरलेली व रिक्त पदांची स्थिती

| अ.क्र. | महसुली विभाग | मंजुर | भरलेली | रिक्त |
|---|---|---|---|---|
| १ | नागपुर | १५४ | ६६ | ८८ |
| २ | अमरावती | १४० | ८० | ६० |
| ३ | औरंगाबाद | २०० | १२४ | ७६ |
| ४ | कोकण-१ | ६१ | ३३ | २८ |
| ५ | नाशिक | १३४ | ११२ | २२ |
| ६ | कोकण-२ | ६७ | ४१ | २६ |
| ७ | पुणे | १९५ | १६१ | ३४ |
| **एकुण** | | **९५१** | **६१७** | **३३४** |

**शासन अधिसूचना दि.१४.०७.२०२१ मधील कलम ६(२)नुसार रिक्त पदे**

**(रविंद्र काळे)**
**सहाय्यक प्रशासकीय अधिकारी**
**कृषी आयुक्तलय,महाराष्ट्र राज्य,पुणे-5**

५५।५

**शासन अधिसुचना- महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, दिनांक - १४ जुलै, २०२१**

(सोबतचा **नमुना "ब"** (बंधपत्र) सरळसेवेने नियुक्तीसंदर्भात)

मी श्री /श्रीमती/ कुमारी ------------------------------------------ या व्दारे असे लिहून देतो /देते की, माझा महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब संवर्गातील पदावर सरळसेवेने नियुक्तीच्या निवडसुचीत समावेश असल्याचे मला क्र. ------------ दिनांक ------------- च्या पत्रांन्वये कळविले आहे. सदर पदांस महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब(क) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली, दि. १४.०७.२०२१ पासुन लागु असून माझी --------------- या पदावर सरळसेवेने नियुक्ती झाल्यावर या नियमातील तरतुदी मला लागु होणार आहेत. सदर नियमावलीतील नियम-७ मधील तरतुदीन्वये लागु असलेली खालील माहिती सादर करीत आहे.

१) स्वत: दिव्यांग कर्मचारी (होय/नाही) (दिव्यांगत्वाचे संगणीकृत प्रमाणपत्र क्र. ---------- जोडणे आवश्यक)

२) जोडीदार किंवा त्याचे मुल मतिमंद आहे किंवा मतिमंद असलेल्या स्वत:च्या भाऊ किंवा बहिणीचे पालकत्व स्विकारलेले आहे. ------------(होय/नाही). (आवश्यक दस्तऐवज सांक्षाकित करून जोडणे आवश्यक राहील.)

३) कायदेशीर कागदपत्राव्दारे एकल पालकत्व सिध्द झालेले अधिकारी. (आवश्यक दस्तऐवज सांक्षाकित करून जोडणे आवश्यक राहील.)

सदर नियमावलीतील तरतुदीच्या अनुषंगाने मी **महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब (तंत्र अधिकारी)** या पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी माझा पहिला पसंतीक्रम # ----------------- या महसुल विभागात सेवा करणेसाठी देत आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

आपला /आपली विश्वासू

स्वाक्षरी ---------------------------

संपुर्ण नाव ------------------------

पत्रव्यवहाराचा पत्ता ----------------

----------------------------------

स्वजिल्हा ------------------------

# १) नागपुर २) अमरावती ३) औरंगाबाद ४) कोकण-१ ५) नाशिक ६) कोकण-२ ७) पुणे, यापैकी कोणताही एक महसुल विभाग नमुद करावा.